आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१६ डिसेंबर २०२४ - सोमवार

- **<u>ठळक बातम्या</u>**
- राज्यसभेत भारताच्या राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वाटचालीवर विशेष चर्चा सुरू
- महाराष्ट्र विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन सुरू,  दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- विख्यात तबलावादक उस्ताद झाकीर हुसैन यांचं अमेरिकेत सॅन फ्रान्सिस्को इथं निधन, राष्ट्रपती, प्रधानमंत्री यांच्याकडून शोक व्यक्त
- **आणि**
- महिला हॉकीत भारतानं पटकावला कनिष्ठ गटातला आशियाई चषक

**<><><><><>**

राज्यसभेत भारताच्या राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वाटचालीवर विशेष चर्चा सुरू आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी चर्चेला सुरुवात केली. त्यांनी घटनासमितीच्या सदस्यांप्रति आदर व्यक्त करत त्यातल्या १५ महिला सदस्यांचा विशेष उल्लेख केला. भारताचं संविधान किती मजबूत आहे याचा अनुभव देशानं घेतल्याचं त्यांनी सांगितलं. तत्पूर्वी नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतली. त्यात भाजपाच्या ३, तेलगु देसम पार्टीच्या २,  तर तृणमूल काँग्रेसाच्या एका सदस्याचा समावेश आहे.

**<><><><><>**

ईव्हीएमबद्दल प्रश्न उपस्थित केल्याबद्दल केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज काँग्रेसवर टीका केली. संसदेबाहेर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

ईव्हीएमला दोष देण्यापेक्षा काँग्रेसनं आपल्या चुका मान्य कराव्यात असंही ते म्हणाले.

<><><><><>

उद्यम पोर्टलवर साडेपाच कोटी एमएसएमइ अर्थात सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांची नोंद झाल्याची माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज दिली. ते लोकसभेत पुरवणी प्रश्नाला उत्तर देत होते. ई-श्रम पोर्टलवर ३० कोटी ४६ लाख कामगारांची नोंदणी झाल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

मध्य प्रदेश विधानसभेचं हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू झालं. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था विधेयकावर चर्चा होणार असून महानगरपालिका कायदा तसंच खाजगी विद्यापीठ सुधारणा विधेयक सादर केलं जाणार आहे. तसंच २०२४-२५ या वर्षासाठीचा १५ हजार कोटी रुपयांचा पुरवणी अर्थसंकल्पही या पाच दिवसांच्या अधिवेशनात मांडला जाईल.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील. दिसानायके आणि त्यांच्याबरोबरच्या मान्यवरांचं आज सकाळी राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात औपचारिक स्वागत करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी उपस्थित होते. अनुरा कुमार दिसानायके तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले असून आज संध्याकाळी ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची भेट घेणार आहेत. तसंच बिहारमधल्या बौद्ध गया इथंही ते भेट देतील. दोन्ही देशांमधले संबंध अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वाची असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २९ डिसेंबर रोजी आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमामध्ये देशातील आणि परदेशातील लोकांशी संवाद साधणार आहेत. हा या रेडिओ कार्यक्रमाचा ११७ वा भाग असेल.

या कार्यक्रमासाठी नागरिक आपले विचार आणि सूचना टोल फ्री क्रमांक 1800-11-7800 वरून पाठवू शकतात. तसेच, नरेंद्र मोदी ॲप किंवा MyGovओपन फोरमद्वारे ऑनलाइनही आपले मत सामायिक करू शकतात. येत्या भागासाठीच्या सूचना या महिन्याच्या २७ तारखेपर्यंत स्वीकारल्या जातील.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषदेचं हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब झालं. विधानसभेत आज कामकाजाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळातल्या मंत्र्यांचा परिचय सभागृहाला करून दिला. त्यानंतर यावर्षीच्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात ३५ हजार ७८८

कोटी ४० लाख रुपये खर्चाच्या पुरवणी मागण्या उदय सामंत यांनी सभागृहात सादर केल्या.

काँग्रेसचे नाना पटोले यांनी परभणी, बीडमधल्या हिंसाचाराच्या घटनांबद्दल सरकारने उत्तर देण्याची मागणी सभागृहात केली. या दोन्ही घटना गंभीर असून याचं राजकारण न करता विरोधकांनी विधायक सूचना कराव्यात अशी अपेक्षा फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली. त्यानंतर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेच्या पटलावर आठ विधेयकं सादर केली.

विधानसभा अध्यक्षांनी महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस एम कृष्णा आणि विधानसभा सदस्य दिनकरराव जाधव यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडले आणि सभागृहात ते स्वीकृत केले. त्यानंतर विधानसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. दरम्यान, विरोधकांनी ईव्हीएम हटवा, लोकशाही वाचवा अशी घोषणाबाजी करत विधिमंडळ सदनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं.

**<><><><><>**

विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीडमधील सरपंच हत्या प्रकरण आणि परभणीमधील आंबेडकरी कार्यकर्त्याच्या कोठडीमधील मृत्यूप्रकरणविषयी मुद्दा उपस्थित केला. सरकारने याबाबत कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली.

त्यावर या संदर्भात चर्चा करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं.  ते म्हणाले..

**होल्ड बाईट - देवेंद्र फडणवीस...**

**<><><><><>**

विख्यात तबलावादक उस्ताद झाकीर हुसैन यांचं काल अमेरिकेत सॅन फ्रान्सिस्को इथे निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. हृदयविकाराचा त्रास जाणवू लागल्यामुळे त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथेच त्यांची प्राणज्योत मालवली. गेल्या सहा दशकांच्या संगीत कारकिर्दीत झाकीर हुसैन यांना ५ ग्रॅमी पुरस्कार मिळाले आहेत. तसंच, पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या देशातल्या नागरी सन्मानाने गौरवण्यात आलं होतं.

उस्ताद झाकीर हुसैन यांच्या निधनामुळे संगीतविश्वाची खूप मोठी हानी झाली आहे. त्यांना लाभलेली सर्जनशीलता आणि कल्पकता विलक्षण होती. झाकीर हुसैन भारतीय आणि पाश्चिमात्य संगीताला जोडणारा पूल होते. त्यांना पद्मविभूषण बहाल करण्याचं भाग्य आपल्याला मिळालं, अशा शब्दांत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

उस्ताद झाकीर हुसैन हे भारतीय शास्त्रीय संगीतविश्वात क्रांती घडवणारा खरा प्रतिभावंत म्हणून कायम स्मरणात राहतील. त्यांनी आपल्या प्रतिभेने लाखो श्रोत्यांना मंत्रमुग्ध तर केलंच पण तबल्याला जागतिक स्तरावर प्रसिद्धीही मिळवून दिली, अशा शब्दांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात तीव्र शोक व्यक्त केला आहे. तर प्रयोगशीलता, कठोर परिश्रम, सशक्त वादनशैल आणि अंगभूत प्रतिभा यांमुळे उस्ताद झाकीर हुसैन यांनी आपल्या तबलावादनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं, अशा शब्दात महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

छत्तीसगड मधल्या बालोद जिल्ह्यात आज झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. तर सात जण गंभीर जखमी झाले आहेत. बालोदमधल्या दोंडी परिसरात ट्रकने कारला धडक दिल्यामुळे हा अपघात झाला.

**<><><><><>**

विजय दिवस आज साजरा होत आहे. १९७१ साली झालेल्या भारत पाक युद्धात भारतानं आजच्या दिवशी पाकिस्तानवर विजय मिळवत ९३ हजाराहून अधिक पाकिस्तानी सैनिकांना युद्धबंदी केलं होतं. त्यानंतर पाकिस्ताननं बिनशर्त शरणागती पत्करली, दुसऱ्या महायुद्धानंतरची ही सर्वात मोठी शरणागती ठरली. यानंतर पूर्व पाकिस्तान वेगळा होऊन बांग्लादेशची निर्मिती झाली.

या विजयाची आठवण म्हणून आज देशभरात सैन्यदलाच्या छावण्यांसह विविध ठिकाणी अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या युद्धात शौर्य गाजवलेल्या सैनिकांचं सामाजिक माध्यमावरून स्मरण करत, हुतात्मा सैनिकांना अभिवादन केलं आहे.

**<><><><><>**

महिला हॉकीत भारतानं कनिष्ठ गटातला आशियाई चषक पटकावला आहे. ओमानची राजधानी मस्कत इथं काल रात्री झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघानं पेनाल्टी शूट आउटमधे चीनचा 3-2 असा  पराभव केला. भारतासाठी साक्षी राणा, इशिका आणि सुनेलिता तोप्पो या तिघींनी गोल केले. भारतीय गोलकीपर निधी हिनं तीन गोल वाचवले. गेल्या वर्षीही

भारतीय महिला संघानं या स्पर्धेचं जेतेपद मिळवलं होतं. या स्पर्धेत भारताच्याच दीपिका शेरावतनं सर्वाधिक १२ गोल केले.

//<><><><><>//